बुधवार, दि ७ मे २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक ३३ वा ● किमंत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# गांधीनगर भागातील रस्त्याचे काम सुरु होणार; कार्यारंभ आदेश निघाला

## मनपाच्या दफ्तर दिरंगाईमुळे काम सुरु होण्यास विलंब?

**दीपक शेळके**

**जालना -** गांधीनगर भागातील भूमि पुजनानंतरही सिमेंट रस्त्याचे काम खोदून ठेवल्यामुळे पुढे सुरु झाले नसल्यामुळे गांधीनगरवासियांचे रस्त्यावरून मार्गक्रमण करतांना हाल होत होते. सोमवार (दि ५) रोजी झालेल्या पावसामुळे तर या भागात रस्त्याला नदीचे स्वरूप अनुभवायला मिळाले. एकंदर भुमिपुजन झाल्यानंतर गुत्तेदारास तात्काळ कार्यारंभ आदेश मिळायला हवे होते. मात्र, मनपा प्रशासनाच्या दफ्तर दिरंगाईमुळे कार्यारंभ आदेश शुक्रवार (दि २ मे २०२५) रोजी मिळाले. त्यामुळे आता गुत्तेदाराकडून रस्त्याच्या कामास सुरुवात होणार हे निश्चित झाले आहे.

जालना शहर महानगर पालिका हद्दीतील वाल्मीक नगर पुल ते रिंग रोड पर्यंत सीसी रोड ( १५ मी व १२ मी) डी पी रोड बांधकाम करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक यांनी खर्च मंजुरीसाठी दिनांक २१ ऑगस्ट २०२४ रोजी क्रं २९८/अ ठराव घेतला तद्नंतर शहर अभियंता यांनी दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी तांत्रिक मान्यता दिली. त्यानंतर मनपा आयुक्त तथा प्रशासक योनी दर मंजुरीसाठी दिनांक १७ एप्रिल २०२५ रोजी क्र ८११ ठराव घेतला होता. दरम्यान आमदार अर्जुनराव खोतकर यांनी या रस्त्याच्या कामाचे भुमिपूजन केले. ठराव, जाहीरात, निविदा, मंजुरी आदी कामांसाठी मनपा प्रशासनाने तत्परतेने काम करणे क्रमप्राप्त होते. मात्र, भुमिपूजनानंतर जवळपास दीड महिन्यांनतर कार्यारंभ आदेश मनपा प्रशासनाने काढल्यामुळे रस्त्याच्या कामास विलंब झाला परिणामी जनतेचे हाल झाले.

### कार्यारंभ आदेशास विलंब का?

मनपाची आवक, होणारा खर्च, मिळणारा निधी या सर्वांची सांगड घालून मनपा विविध विकास कामे हाती घेत आहे. त्यातच मर्जीतील कंत्राटदारांची देयके अदा करण्यासाठी पुढील काम ताटकळत ठेवण्यात मनपा आयुक्त तथा प्रशासक यांनी चांगलाच ताळमेळ बसविला आहे. युवा आदर्शच्या हाती आलेल्या वृत्तनुसार गांधीनगर भागातील रस्त्याच्या कामाच्या कार्यारंभ आदेशास विलंब होण्यासाठी एका कंत्राटदाराचे बील अदायगी देण्यासाठीची धडपड कारणीभूत आहे. मुळात काही दिवसांपुर्वीच त्या कंत्राटदाराची टॅक्स अधिकाऱ्यांनी झाडाझडती घेतली होती. मनपा आयुक्तांच्या मनमानी कारभारामुळे गांधीनगर वासियांना दीड महिन्यांपासून त्रास सहन करावा लागत आहे. याबाबीकडे आमदार अर्जुनराव खोतकर लक्ष देतील का? असा प्रश्न सर्वसामान्यांमधून उपस्थित होतो आहे.

### मनपाने गेल्या दीड महिन्यात दिलेल्या देयकांची चौकशी होणार का?

गांधीनगर भागातील रस्त्याच्या कामासाठीच्या कार्यारंभ आदेशास विलंब झाला यासाठी मनपा आयुक्तांची देयकांची ॲडजेस्टमेंट कारणीभूत असल्याची माहिती समोर येत आहे. आ. अर्जुनराव खोतकर यांनी २३ मार्च २०२५ रोजी या रस्त्याच्या कामाचे भूमिपुजन केले होते. त्यानंतर तातडीने रस्त्याचे खोदकाम सुरु करण्यात आले होते. त्यानंतरही मनपाने केलेल्या दिरंगाई मुळे दीड महिना उलटल्यानंतर कार्यारंभ आदेश दिल्या गेले. अशा वेळी नेमके कोणती देयके देण्यासाठी मनपाकडून ही दिरंगाई झाली. गेल्या दीड महिन्यात कोणत्या कंत्राटदारास देयके अदा करण्यात आली याची चौकशी होणार का? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो आहे.

# गाडेगव्हाण येथील गावकऱ्यांच्या वतीने दारूबंदीचा ठराव मंजूर

**दत्ता देशमुख**

**जाफराबाद -** तालुक्यातील गाडेगव्हाण येथील ग्रामपंचायत गावकऱ्यांच्या वतीने दारूबंदीचा ठराव मंजूर करण्यात आला यावेळी सर्व गावकरी उपस्थित होते सरपंच ज्ञानेश्वर बनकर उपसरपंच बाबुराव बनकर ग्रामसेवक सवडे साहेब यांचे अध्यक्षखाली ग्रामपंचायतने ठराव मंजूर केला आहे गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते तसेच म हिला मंडळ सुद्धा उपस्थित होते



अवैध देशी व विदेशी दारू भन्नाट विक्री किराणा दुकानांमध्ये विक्री होत असून होत आहे याकडे सर्व गावकऱ्याचे संतप्त सवाल व्यक्त होत आहे गाडेगव्हाण येथील दारू बंद करण्यात यावे टेंभुर्णी पोलीस स्टेशन मध्ये निवेदन देऊन सुद्धा गाडेगव्हाण येथील देशी व विदेशी दारू विक्री होत आहे सदरील टेंभुर्णी पोलीस स्टेशन दुर्लक्ष करीत असल्याने गाडेगव्हाण येथील देशी दारू विक्री होत असल्याम ुळे गावकऱ्यांना त्रास होत आहे त्वरित देशी दारू बंद करण्यात यावे प्रत्येकाच्या घरी भांडण झगडा होत असल्यामुळे दारू पिऊन घरामध्ये भांडण झगडा होत आहे त्याकरिता गावातील म हिलांनी सुद्धा दारू बंद करण्यात याव्यात असे किती वेळा टेंभुर्णी पोलीस स्टेशन म धील निवेदन मागील वर्षी देण्यात आले आहे टेंभुर्णी पोलीस स्टेशन कोणतीही कारवाई न करता गाडेगव्हाण येथील देशी दारू विक्री होत आहे गाडेगव्हाण येथील ग्रामस्थांच्या वतीने नाराजीचा सुर व्यक्त होत आहे व गावकरी संताप व्यक्त करीत आहे अवैध रीतीने देशी दारू बंद करण्यात यावे असे गावकऱ्यांनी म्हटले आहे.

अशोक बनकर, दीपक बनकर, सोनपाल खरात, गजानन देठे, केशवराव बनकर, साहेबराव देठे, शेषराव बनकर, भगवान बनकर, विश्वास देठे, श्रीराम बनकर, संतोष विलास बनकर, नदु बनकर, बाबासाहेब बनकर, कृष्णा सगळे, ज्ञानेश्वर देठे, अरूण सावंत, रतन सावंत आदींचा यात समावेश होता.

## सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचे आ. खोतकरांकडून स्वागत

# निवडणूकीस सामोरे जाण्यास तयार



**जालना । प्रतिनिधी -** वादाचे म ुद्दे टाळून ठराविक वेळेत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका घ्याव्यात असे स्पष्ट निर्देश सुप्रीम कोर्टाने राज्य सरकारला दिले. सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी स्वागत केले. आम्ही कधीही निवडणुकीला सामोरे जाण्यास तयार असल्याचेही आ. खोतकर यांनी यावेळी म्हटले आहे. मंगळवार (दि ६) रोजी माध्यम ांशी बोलत होते.

सप्टेंबरपुर्वी निवडणुकांचा कार्यक्रम पूर्ण करण्याचे आदेश सुप्रीम कोर्टांने दिली असून पुढील चार आठवड्यात निवडणुकीची अधिसूचना जारी होणार आहे. त्यामुळे राज्यातील प्रशासक नियुक्त महानगर पालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषद, नगरपंचायत यांच्या. निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे.

# अपर जिल्हादंडाधिकारी यांचे कलम ३७ (१) व (३) अन्वये आदेश जारी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात दि. ४ मे २०२५ रोजी महाराणा प्रताप जयंती, दि.१२ मे २०२५ रोजी बुध्दपोर्णिमा, दि. १४ मे २०२५ रोजी छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी होणार असल्याने जालना जिल्ह्यात व शहरात विविध कार्यक्रम आयोजित होतात. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक एकत्र येत असतात. तसेच मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण बचाव धनगर समाज एस.टी. प्रवर्गात समाविष्ठ करावे या अनुषंगाने जिल्ह्यात विविध प्रकारचे आंदोलन कार्यक्रम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे असुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

तसेच सध्या महाराष्ट्रात राजकीय दृष्ट्या सत्ताधारी व विरोधकात एकमेकाविरुध्द आरोप प्रत्यारोप विविध कारणास्तव सुरु आहे. तसेच शेतक-यांचे विविध मागणीसाठी विविध संघटनांकडून आत्मदहन, उपोषण, धरणे, मोर्चे, निदर्शने, रास्तारोको इत्यादी सर्व प्रकारची आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे अपर जिल्हादंडाधिकारी जालना यांना प्राप्त अधिकारानुसार पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) अन्वये शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यांच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी किंवा त्या आसपास शस्त्रे, लाठ्या, सोटे, बंदुके, तलवारी , भाले, चाकु व इतर शरीरास इजा अथवा अपाय करणा-या वस्तु जवळ बाळगणार नाही. तीक्ष्ण पदार्थ अथवा स्फोटके सहज

**पान २ वर**

# सौ. देठे यांच्याकडून सुप्रीम कोर्टाचे अभिनंदन

**जालना । प्रतिनिधी -** गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लांबणीवर पडल्या होत्या. परिणामी विविध महानगर पालिका, नगर पंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समितीवर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आलेली होती. सुप्रीम कोर्टाने निवडणुका घेण्याचे आदेश दिल्यानंतर विविध स्तरावर राजकारण्यांकडून प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. भारतीय जनता पक्ष महिला मोर्चाच्या जालना जिल्हाध्यक्ष सौ. संध्या देठे यांनी यावर प्रतिक्रिया देतांना म्हटले आहे की, राजकीय कार्यकर्त्यांना समाजकारणाची नव दिशा देण्यासाठी नवी उमेद मिळाली आहे. सुप्रीम कोर्टाचे त्यांनी अभिनंदन केले आहे.

# संपादकीय

## दोन राष्ट्रगीतांचे जनक

आज ७ मे, भारत मातेचे महान सुपूत्र , चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगितकार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची जयंती. रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकात्यातील जोर - सांको येथे झाला. त्यांच्या आईचे नाव शारदादेवी तर वडिलांचे नाव महर्षी देवेंद्रनाथ टागोर असे होते. रवींद्रनाथ टागोरांनी आपले शिक्षण घरीच विविध विषयांच्या खाजगी शिक्षकांच्या हाताखाली घेतले. त्यांनी लहान वयातच कविता लिहायला सुरुवात केली. वयाच्या आठव्या वर्षीच त्यांनी आपली पहिली कविता लिहिली. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपण नावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. बॅरिस्टर होण्याआधी त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेज येथे प्रवेश घेतला परंतु १८८० मध्ये कोणत्याही पदवी शिवाय ते बंगालमध्ये परतले. १४ नोव्हे १९१३ रोजी गीतांजली या रचनेबदद्ल स्वीडीश अकादमीचा नोबेल पुरस्कार त्यांना देण्यात आला. गीतांजलीचे भाषांतर स्वतः रवीन्द्रनाथांनीच केले होते. रवींद्रनाथ हे भारताचे व आशियाचे पहिले नोबेल विजेते होत. १९१५ साली त्यांना ब्रिटीश सरकारने सर ही पदवी दिली. १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली. रवीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांगलादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे जगातील एकमेव कवी आहेत. पारंपारिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला. रविंद्रनाथकालीन भारतामध्ये सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळींचे प्रमुख केन्द्रांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राचा प्रभाव रवींद्रनाथांवरही पडला होता. संत तुकारामांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता. संत तुकारामांचे काही अभंग त्यांनी बंगाली भाषेत अनुवादित केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनही त्यांच्या साठी प्रेरणास्थान होते. छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी एक खंडकाव्यही रचले आहे. शांतीनिकेतनाची उभारणी, विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवीन्द्रसंगीताचे सृजन हे रवीन्द्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होय. रवींद्रनाथ टागोरांना गुरुदेव असे संबोधले जाते, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी रवींद्रनाथांच्या कार्यामुळे बंगाली साहित्यात व बंगाली संगीतात आमूलाग्र बदल घडून आला. बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रविंद्रोत्तर अशी विभागणी केली जाते यावरून बंगाली साहित्यावर रवींद्रनाथांच्या प्रभाव लक्षात येतो. एक महान कवी असण्यासोबतच ते एक महान देशभक्त होते त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात मोठ्या संख्येने भारतीय लोकांना प्रभावित केले. ७ ऑगस्ट १९४१ रोजी रवींद्रनाथ टागोर यांचे निधन झाले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### पान १ वरुन

## अपर जिल्हादंडाधिकारी ...

हाताळता येतील अशी घातक वस्तु जवळ बाळगणार नाही. दगड किंवा इतर उपकरणे किंवा प्रवर्तक शस्त्रे गोळा करुन ठेवणार नाही किंवा जवळ बाळगणार नाही. व्यक्तींच्या किंवा समुहाच्या भावना जाणुनबुजुन दुखविण्याचे उद्देशाने असभ्यतेने भाषण म्हणणार नाही, वाद्य वाजविणार नाही, गाणे म्हणणार नाही. व्यक्तिंचे किंवा शवाचे किंवा त्याच्या प्रतिकृतीचे प्रदर्शन करणार नाही. आवेषी भाषण, अंगविक्षेप,विडंबनापर नकला करणार नाही आणि सभ्यता किंवा नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा कोणतीही वस्तु बाळगणार नाही. तसेच अपर जिल्हादंडाधिकारी जालना यांना प्राप्त अधिकारानुसार पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३) अन्वये पाच किंवा अधिक व्यक्तींना जमण्यास किंवा सभा, मिरवणुका, मोर्चा काढण्यास मनाई केली आहे.

हा आदेश कामावरील कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांना लागु होणार नाही. तसेच विवाह, अंत्ययात्रा आणि पोलीस अधिक्षक जालना व उपविभागीय पोलीस अधिकारी जालना, अंबड, परतुर, भोकरदन यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुका, सभा, मोर्चा यांना लागु राहणार नाही. हा आदेश संपुर्ण जिल्ह्यासाठी दि. ५ मे २०२५ रोजीच्या ६.00 वाजेपासुन ते दि. १८ मे २०२५ रोजीचे रात्री १२.00 वाजेपर्यंत अंमलात राहील. असे आदेशात नमुद करण्यात आले आहे.

# १८ जून; शेतकरी पारतंत्र्य दिन

१८ जून १९५१ रोजी पहिली घटनादुरुस्ती (बिघाड) करण्यात आला. अनुच्छेद ३१ (ए) व (बी) मध्ये संशोधन करून १) संविधानात नसलेले परिशिष्ट-९ (अनुसूची-९) जोडण्यात आले. २) या परिशिष्टात टाकण्यात आलेल्या कायद्यांच्या विरुद्ध न्यायालयात दाद मागता येणार नाही.

३) मूलभूत अधिकारांचा संकोच करणाऱ्या कायद्यांविरुद्ध सुद्धा न्यायालयांना निवाडा करण्यास मज्जाव करण्यात आला. अशी तरतूद अनुच्छेद ३१ (ए) व (बी) मध्ये समाविष्ट करण्यात आली.

**या घटनादुरुस्तीचा शेतकऱ्यांशी संबंध काय?**

आज परिशिष्ट ९ मध्ये एकूण २८४ कायदे आहेत, त्यापैकी सुमारे २५० कायदे हे थेट शेती व शेतकऱ्यांशी संबंधित आहेत. हा योगायोग नाही. शेतकऱ्यांना गुलाम करण्यासाठी या घटना (बिघाड) दुरुस्तीचा वापर करण्यात आला. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना कारणीभूत ठरलेले कमाल शेतजमीन धारणा (सीलिंग), आवश्यक वस्तू व जमीन अधिग्रहण हे संविधान विरोधी कायदे या परिशिष्टात टाकल्यामुळे न्यायालये त्यांना रद्द करू शकले नाहीत. त्यांचा फटका शेतकऱ्यांना बसला. वरील कायदे हे विषारी साप आहेत व परिशिष्ट ९ हे विषारी सापांना संरक्षण देणारे वारूळ आहे!

**पहिली घटना दुरुस्तीच्या वेळी काय परिस्थिती होती?**

ही घटना दुरुस्ती (बिघाड) झाली तेंव्हा हंगामी सरकार होते. तोपर्यंत पहिली निवडणूक झालेली नव्हती. या हंगामी सरकारला घटनादुरुस्ती करण्याचा कायदेशीर अधिकार होता. मुद्दा नैतिकतेचा आहे.

पहिली निवडणूक सहा महिन्यांनी होणार होती, पण तत्कालीन सरकारने वाट पाहिली नाही. घाई करून ही दुरुस्ती केली.

आपल्याच देशात संविधान लागू झाल्यानंतर अवघ्या दीडच वर्षात पहिली घटना दुरुस्ती झाली.

जमीनदारी संपुष्टात आणणे व आरक्षणाला सुरक्षित करणारे कायदे आवश्यक आहेत, असे त्याकाळी सांगण्यात आले होते. त्या काळाची ती गरज वेगळ्या मार्गाने पूर्ण करता आली असती. त्यासाठी संविधानात कायमची व्यवस्था निर्माण करण्याची गरज नव्हती. या घटना बिघाडामुळे न्यायालयाची स्वायत्तता मर्यादित झाली, त्यामुळे संवैधानिक संतुलन बिघडले. या घटना दुरुस्तीने लोकशाहीचा पाया डळमळीत केला. शेतीक्षेत्र देशांतर्गत गुलाम व वसाहत बनले. या दुरुस्तीने संविधान उलटे केले अशी टीका काही घटनातज्ञानी केली. पण कोणत्याच पक्षाच्या सरकारने परिशिष्ट९चा पुनर्विचार केला नाही, याचा अर्थ असा की, शेतकऱ्यांना गुलाम करणारी व्यवस्था या सर्व सरकारांना हवी होती. म्हणजेच आम च्या देशातील सर्व पक्षांचे हात शेतकऱ्यांच्या रक्ताने माखले आहेत!

शेतकरी पारतंत्र्य दिवस कसा पाळतात?

१) विषारी साप असलेले सीलिंग, आवश्यक वस्तू अधिग्रहण हे कायदे रद्द करण्याची निवेदने आम्ही देशातील राष्ट्रपती पासून सर्व सत्ताधाऱ्यांना पाठवतो. तुम्हीही पाठवू शकता.

२) काळी फीत लावतो व घरावर काळा झेंडा लावतो.

३) स्थानिक व राज्यस्तरीय सभा घेऊन जनजागृती करतो.

याही वर्षी १८ जून- शेतकरी पारतंत्र्य दिवस ठिकठिकाणी व्हावा यासाठी किसानपुत्रांनी प्रयत्न करावा!

**अमर हबीब, आंबाजोगाई**
**किसानपुत्र आंदोलन**
**मो ८४११९०९९०९**

# सनातन राष्ट्र शंखनाद : एक पाऊल रामराज्याकडे !

वैश्विक इतिहासात अनेक संस्कृती उदयाला आल्या आणि लोप पावल्या. उदा. इजिप्शियन, ग्रीक, रोमन, संस्कृती आदी; पण राजकीय संघर्ष, परकीय आक्रमणे, नैसर्गिक आपत्ती आदी संकटांना तोंड देत एकच संस्कृती टिकून राहिली, ती म्हणजे 'सनातन संस्कृती' ! सनातन म्हणजे शाश्वत, चिरंतन टिकणारे, तरीही नित्यनूतन असणारे तत्त्व ! सनातन धम नि नेहमीच विश्वकल्याणाची संकल्पना मांडली आहे. सनातन धर्म हाच भारताचा प्राण आहे. जोपर्यंत सनातन धर्माचे अनुसरण होत होते, तोपर्यंत भारत वैभवाच्या शिखरावर होता; पण गेल्या काही दशकांमध्ये सनातन धर्माकडे हेतुपुरस्सर हेटाळणीच्या रूपात पाहिले गेले. परिणामस्वरूप अनेक कौटुंबिक, मानसिक, सामाजिक, धार्मिक, तसेच राष्ट्रीय संकटे निर्माण झाली. आज आंतरराष्ट्रीय अनुदानावर पोसल्या जात असलेल्या अनेक व्यक्ती, तसेच संघटना सनातन धर्म संपवण्याचा विडा उचलून कार्यरत झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर सनातन धर्माच्या रक्षणासाठी देव, देश, धर्म यांची सेवा करणार्या व्यक्ती, संस्था, तसेच संघटना यांचे संघटन आणि जागरण होणे आवश्यक आहे. सनातन धर्माच्या बळकटीकरणातूनच रामराज्यासम तेजस्वी राष्ट्राचे निर्माण शक्य आहे. त्यासाठीच गोवा येथे १७ ते १९ मे या कालावधीत 'सनातन राष्ट्र शंखनाद' महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

सनातन राष्ट्राची संकल्पना : सनातन सिद्धांत हे मूलतः कल्याणकारी, व्यक्तीची ऐहिक-पारमार्थिक उन्नती साधणारे, तसेच सर्वसमावेशक आहेत. ते कुठल्याही व्यक्तीसमुहापुरते संकुचित नसून अखिल मानवजातीसाठीच लागू आहेत. सनातन तत्त्वे ही न्याय, समानता, नीती, योग, साधना आदींवर आधारित आहेत. वेद, उपनिषदे, गीता, रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी आदी सनातन धर्मग्रंथांमध्ये याविषयीचे तत्त्वज्ञान आहे. सनातन राष्ट्र हे या तत्त्वांवर चालणारे एक आदर्श कल्याणकारी राष्ट्र असेल. थोडक्यात, त्रेतायुगातील रामराज्याचे कलियुगातील स्वरूप म्हणजे 'सनातन राष्ट्र' असे म्हणता येईल.

सद्यस्थिती आणि धर्माचे अधिष्ठान असण्याचे महत्त्व : सध्याच्या धर्मनिरपेक्ष व्यवस्थेत गो, गंगा, गीता, तुळस, मठ-मंदिरे आदी सनातन मानबिंदूंवर सातत्याने आघात होत आहेत. आधुनिकता आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य यांच्या नावाखाली सनातन श्रद्धास्थानांचे हनन केले जात आहे. हिंदूंच्या धार्मिक परंपरा, आचार यांना अंधश्रद्धेचे 'लेबल' लावले जात आहे. वैदिक विज्ञानाला छद्म विज्ञान म्हणजे 'र्शिर्वि' लिळशपलश असे म्हणत टीका केली जात आहे. कौटुंबिक स्तरावर पहायला गेले, तर देवीस्वरूप मानली गेलेली महिला सुरक्षित नाही. कुटुंबामध्येसुद्धा एकमेकांमधील आपुलकी, जिव्हाळा कमी झाला असून व्यक्ती भौतिकदृष्ट्या संपन्न झाल्या असल्या, तरी मानसिकदृष्ट्या दुर्बल झाल्या आहेत; माणसांची संकटांना सामोरे जाण्याची क्षमता उणावली आहे, असे पहायला मिळते. या सगळ्या परिस्थितीचे मुख्य कारण म्हणजे धर्माचरण आणि साधना-उपासना यांच्या बळाचा अभाव ! धर्माचे अधिष्ठान असेल, तरच व्यक्तीची, पर्यायाने समाजाची आणि राष्ट्राची उन्नती होते. धर्मविहीन भारत म्हणजे केवळ भूगोल असून भारताच्या गौरवशाली इतिहासाची परंपरा भविष्यातही चालवायची असेल, तर धर्माचे रक्षण होणे आवश्यक आहे.

सनातन राष्ट्राची आवश्यकता : आज धमर्विरील आघातांच्या विरोधात जागृती होऊन धर्मरक्षणार्थ चळवळी होत असल्या, तरी हिंदुत्वावर होत असलेले आघात पूर्णपणे थांबले नाहीत. 'प्लेसेस ऑफ वर्शिप क्ट'सारख्या काळ्या कायद्यांनी परकीय आक्रमकांनी उद्ध्वस्त केलेल्या मंदिरांच्या पुनर्निर्माणाचा मार्ग अडवला आहे. नुकत्याच पारित झालेल्या सुधारित वक्फ कायद्यामुळे वक्फ बोर्डाच्या मनमानीला काही प्रमाणात आळा बसला असला, तरी या कायद्याची प्रत्यक्ष कार्यवाही होऊन धर्मांधांकडून अवैधरित्या बळकावल्या गेलेल्या जमिनी मोकळा श्वास कधी घेतील, हे येणारा काळच सांगेल. आज घुसखोरीच्या गंभीर संकटामुळे अनेक प्रदेश भारतापासून वेगळे होण्याच्या मार्गावर आहेत. वर्तमान व्यवस्थेत धर्म आणि राष्ट्र यांवरील आघात सक्षमपणे परतवले जात नसल्याने सनातन राष्ट्राची आवश्यकता आहे. देशाचा विकास केवळ जीडीपी किंवा टेक्नोलॉजी यांमुळे होत नाही, तर तो धर्मामुळे होतो (धर्मेण जयति राष्ट्रम्); म्हणूनच भारतीय संस्कृतीत सोन्याच्या लंकेची नाही, तर श्रीरामाच्या रामराज्याची पूजा केली जाते.

सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा दूरदर्शीपणा : आज 'सनातन' हा विषय मोठ्या प्रमाणात चर्चिला जात असून हिंदु राष्ट्राच्या मागणीनेही जोर धरला आहे. सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांनी तब्बल २७ वर्षांपूर्वी म्हणजे ज्या काळी सनातन हा शब्द सोडा; हिंदु हा शब्द उच्चारणेही धाडसाचे ठरवले जायचे, अशा काळी ईश्वरी राज्याची स्थापना हा ग्रंथ लिहून अध्यात्मावर आधारित राष्ट्ररचना ही संकल्पना मांडली. संतांचे द्रष्टेपणा यातून दिसून येते. आतापर्यंत सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांनी धर्म, अध्यात्म, साधना आदींविषयी ३८० हून अधिक ग्रंथ संकलित केले असून भारतीय संस्कृतीतील कला-विद्या यांच्या पुनरुज्जीवनासाठी अनेक उपक्रम चालू केले आहेत. हिंदुत्वावरील आघात सर्वदूर पोहोचवण्यासाठी त्यांनी 'सनातन प्रभात' हे प्रखर हिंदुत्वनिष्ठ नियतकालिक चालू केले. त्यांच्या प्रेरणेने हिंदुऐक्याच्या दृष्टीनेही अनेक चळवळी राबवल्या जात आहेत. या कार्याचा अल्पावधीत देश-विदेशात झालेला विस्तार ही त्यांच्या दैवी कार्याचीच साक्ष आहे.

सनातन राष्ट्र शंखनाद : सनातन संस्थेचा रौप्यमहोत्सव आणि सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा जन्मोत्सव यांनिमित्त आयोजित केलेला 'सनातन राष्ट्र शंखनाद' हा केवळ धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रम नसून तो धर्म आणि राष्ट्र रक्षणाच्या वाटचालातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताच्या उज्ज्वल भविष्याचा हा शंखनाद आहे. या निमित्ताने सनातन धर्माच्या सेवेसाठी कृतीशील आणि गतीशील होणे, हे एकप्रकारे राष्ट्ररचनेच्या अर्थात् धर्मसंस्थापनेच्या कार्यात सहभागी होणेच आहे. हीच सध्याच्या काळातील साधनाही आहे.

**संकलक : श्री. चेतन राजहंस, राष्ट्रीय प्रवक्ता,**
**सनातन संस्था**
**संपर्क क्रमांक: ७७७५८५८३८७**

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

## वाचकांचे मनोगत

# सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव !

छत्रपती शिवाजी महाराजांनी जिजाऊ आईसाहेबांच्या प्रेरणेने सह्याद्रीच्या डोंगरदऱ्यात रहाणार्या अठरापगड जातीच्या मावळ्यांना हिंदवी स्वराज्याचे ध्येय देऊन भारतावर निर्माण झालेले परकीय साम्राज्य उलथवून लावून 'हिंदवी स्वराज्य' स्थापन केले, जे भारतभर पसरले. सध्याच्या काळात परकीय पंथांनी भारतभरात मांडलेला उच्छाद रोखण्यासाठी प. पू. डॉ. हेडगेवार, परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले जी, पू. संभाजीराव भिडे गुरुजी तसेच अनेक राष्ट्र-धर्म प्रेमींनी विविध संघटना स्थापन करून जाती-भाषा-प्रांत यांच्या पलिकडे जाऊन सर्वसामान्य हिंदू जनतेस जागृत आणि संघटित केले आहे. सध्याचा काळ पुनः इतिहासाची पुनरावृत्ती करण्यासाठी या विविध संघटनांना, सर्वसामान्य हिंदू जनतेला साद घालत आहे. यातून सर्व विश्वाचे कल्याण साधणाऱ्या सनातन राष्ट्राची, रामराज्याची निर्मिती करण्यासाठी विविध संत, आध्यात्मिक संस्था, १५ हून अधिक देशविदेशातील १००० हून अधिक संघटना, विविध राज्यांतील हिंदुत्वनिष्ठ मुख्यमंत्री, मंत्री, लोकप्रतिनिधी, २५ हजारांहून अधिक राष्ट्र-धर्म प्रेमी डॉक्टर, इंजिनिअर, अधिवक्ते, उद्योजक, कार्यकर्ते आणि सर्वसामान्य जनता गोव्यातील फोंडा येथे सनातन संस्थेने १७, १८, १९ मे रोजी आयोजित केलेल्या सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवातून विश्वाला श्रीमद्भगवद्गीतेचे संदेश आचरणात आणण्याची दिशा देण्यासाठी एकत्र येत आहेत. यामध्ये वैशिष्ट्यपूर्ण अशी संतसभा (संतांचे मार्गदर्शन), हिंदुत्वनिष्ठ नेते आणि धर्माभिमानी यांचे विचार, रामराज्य संकल्प जप यज्ञ (एक कोटी श्रीराम नामजप), सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचा जन्मोत्सव, म हाधन्वंतरी यज्ञ, शिवकालीन शस्त्रे आणि युध्दकला प्रदर्शन, लोकनृत्य, तसेच अन्य चैतन्यदायी सांस्कृतिक कार्यक्रम यांचे आयोजन करण्यात आले आहे.

सर्व समाजाने यात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग घेऊन या युगपरिवर्तनात आपापल्या क्षमतेनुसार सिंहाचा/खारीचा वाटा उचलून इतिहास घडवला पाहिजे.

**संतोष गवळी, अहिल्यानगर**

# मुलींसाठी स्वतंत्र आयटीआय; मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय

**मुंबई -** पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त फडणवीस सरकारने प्रथमच अहिल्यानगरच्या चौंडीत राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीचे आयोजन केलंय. आजच्या (६ मे २०२५) या ऐतिहासिक कॅबिनेट बैठकीच्या माध्यमातून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिशय महत्वाच्या निर्णयांची घोषणा केली आहे. आज बैठकीच्या निमित्ताने चौंडीला स्मृतीस्थळाच्या जतन आणि संवर्धन करण्यासाठी ६८१ कोटी रुपयांचा आराखडा मान्य केलाय. या निधीतून विविध प्रकारची कामं होतील असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितलंय. दरम्यान, अष्टविनायक मंदिरासाठी १४७ कोटी रुपये, तुळजापूर मंदिरासाठी १८६५ कोटी रुपये, नाशिकच्या त्र्यंबकेश्वर मंदिर विकास आराखड्यासाठी २७५ कोटी रुपये, सोबतच विदर्भातील माहूरगड विकास आराखड्यासाठी ८२९ कोटी रुपये, असे एकूण ५ हजार ५२० कोटी रुपयांच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे. तर दुसरीकडे अहिल्यानगर जिल्ह्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारणार असल्याची घोषणा ही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलीय. सोबतच मुलींचे स्वतंत्र आयटीआय देखील असणार असल्याचे ते म्हणाले.

# विदर्भातील महत्त्वपूर्ण पर्यटन मनसर येथील रामधाम

विदर्भात अनेक पर्यटन स्थळे आहेत.त्याचा आपण आनंद घेतच असतो आणि घेतला सुध्दा पाहिजे.परंतु नागपूर पासुन ४० कीलो मिटर अंतरावर असलेले रामटेक रोडवरील मनसर येथील प्रख्यात रामधाम पर्यटन स्थळ सर्वांनाच आनंद देणारे व मनमोहून जाणारे आहे.याठीकाणी वॉटर पार्क,बर्डपार्क आणि धार्मिक दृष्ट्या संपूर्ण देवी-देवतांचा संगम सुध्दा याठिकाणी आपल्याला पहायला मि ळतो.रामायनातील दृष्ये, महाभारतातील श्रीकृष्णलीला,बारा ज्योतिर्लिंगांच्या प्रतिकृतीचे दर्शन,महाराष्ट्रातील अष्टविनायकाचे दर्शन व वैश्नवदेवीचे दर्शन सुध्दा याठिकाणी हुबेहूब पहायला मिळते व दर्शन होते. सोबतच या संपूर्ण देवीदेवतांची सजावट गुफ ेच्या माध्यमातून असल्याने याचा आगळेवेगळा आनंद मिळतो व पर्यटकांमध्ये एक नवीन ऊर्जा निर्माण होते आणि अनेक देवीदेवतांचे दर्शन सुध्दा होते. त्याचप्रम ाणे मानव आणि पशुपक्षी यांच्यातील नाते कीती अतुट असतात याचे जिवंत उदाहरण या स्थळी आपण चांगल्याप्रकारे अनुभवू शकतो.कारण याठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचे पशुपक्षी आपल्या सानिध्यात कसे वावरतात व कसे रहातात याचाही साक्षात अनुभव आपल्याला आपल्या डोळ्यासमोर मिळतो व आपण मंत्रम ुग्ध होतो.या निसर्गरम्य परिसरात आपल्याला आपुलकीच्या नात्यांचे साक्षात दर्शन सुध्दा होते.आपण अनेक पर्यटन स्थळांना भेट अवश्य दिली असेल यात दुमत नाही.परंतु नागपूर पासुन ४० किलो मिटर अंतरावर असलेल्या रामटेक रोडवरील मनसर येथील रामधाम पर्यटन स्थळांला अवश्य भेट देऊन आपण एक आगळा वेगळा आनंद नक्कीच घेवू शकाल आणि घेतला सुध्दा पाहिजे.कारण या स्थळाचा आनंद मी स्वतः अनुभवला आहे. याठीकाणी वेगवेगळ्या प्रकारचे सहा वॉटर पार्क असुन नैसर्गिक धबधब्याच्या प्रतिकृतीचा सुध्दा आनंद आगळावेगळाच अनुभवायला मिळतो. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात लहानांपासून तर मोठ्यांपर्यंत खेळण्याची



मनोरंजनात्मक आगळीवेगळी साधने याठिकाणी मोठ्या प्रम ाणात दिसून येते.अत्याधुनिक खेळांच्या साहित्यांचा वेगवेगळ्या खेळांचा आनंद बालकांपासुन तर मोठ्यांपर्यंत सर्वांनाच सहज घेता येतो. पर्यटकांनी राज्यातील सर्वच पर्यटन स्थळांना भेट अवश्य द्यावी.परंतु विदर्भातील नागपूरपासुन ४० किलो मिटर अंतरावर असलेल्या रामटेक रोडवरील मनसर येथील रामधाम' पर्यटन स्थळाला भेट अवश्य दिली पाहिजे. कारण या स्थळी दररोज शेकडो पर्यटक आपली हजेरी लावतात व भरपूर आनंद अनुभवतात.आपणही सर्वांनी याचा आनंद अवश्य घ्यावा.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर**

# ढीगभर आश्वासनापेक्षा टिचभर मदत बरी

सहज एका शाळेच्या वर्गात जाऊन बसलो होतो. त्या शाळेच्या भिंतीवर लिहिलेल्या एका सुंदर सुविचारावर माझी नकळतपणे नजर गेली. आणि मी तो सुविचार वाचून काढला. तो सुविचार होता, ढीगभर आश्वासनापेक्षा कधीही टिचभर मदत बरी. हा सुंदर सुविचार माझ्या मनाला खूप भावला. आणि तो सुविचार वाचून माझे मन काही वेळ स्तब्ध झाले. माझ्या डोक्यात विचारचक्र सुरू झाले. आणि म ाझ्या मनाला लगेच प्रश्न पडला की, आजकालची माणसे आश्वासने मात्र ढीगभर देतात. पण दिलेल्या आश्वासनांची पूर्तता खरंच करतात का? दिलेल्या शब्दाला व वचनाला जागतात का? तर नाही असेच म्हणावे लागेल. कारण आश्वासन देणारे बहुतांश लोक आश्वासनाची पूर्तता करण्यात सपशेल अपयशी ठरतात. जनतेला आश्वासन द्यायचे आणि आपला स्वार्थ साधून घ्यायचा. हा खेळ सध्या सर्वत्र सर्रासपणे चालू आहे. लोकांना आश्वासन देणारे लोक खूप स्वार्थी व मतलबी असतात. आपले काम होईपर्यंत लोकांना गोडगोड बोलतात. निष्फळ आश्वासनांचा भडीमार करतात. मी तुझ्यासाठी हे करणार आहे, तुझ्यासाठी ते करणार आहे, तुझ्या शिक्षणासाठी मी एवढा खर्च करणार आहे. असे एक ना अनेक आश्वासन देऊन लोकांची दिशाभूल करण्याचे काम आजकाल काही महाभाग करताना दिसतात. विशेष म्हणजे राजकीय क्षेत्रातील लोकांना आश्वासन देण्याची खूप मोठी खाज असते. निवडणूक जवळ आली की, काही राजकारणी लोक आश्वासनांचा जाहीरनामा घेऊन गावोगावी फिरतात. आपल्या भाषणात लोकांना जाहीरनामा वाचून दाखवतात. मोठमोठे आश्वासन देऊन भोळ्याभाबड्या जनतेची दिशाभूल करतात. आणि त्यांची मते घेऊन निवडून येतात. आणि मग पाच वर्षे जनतेला साधे तोंड देखील दाखवायला तयार नसतात. विकासकामे करणे तर बाजूलाच. फक्त स्वतःचे व आपल्या जवळच्या नातेवाईकांचे पोट भरायचे बघतात. मग काय? सगळे आश्वासन कचऱ्याच्या डब्यात. म्हणून ढीगभर आश्वासन देण्यापेक्षा टिचभर काम करून लोकांना सहकार्य केलेले कधीही बरेच असणार आहे. कारण जो माणूस आश्वासन देतो, तो माणूस आश्वासनाला कधीच जागत नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. म्हणून ढीगभर आश्वासन देणाऱ्या व्यक्तीवर कधीच विश्वास ठेवायचा नसतो. ते विश्वासघात केल्याशिवाय राहत नाहीत. पण जो व्यक्ती ढीगभर आश्वासन न देता टिचभर काम करून लोकांना दाखवतो, तोच माणूस जनतेशी प्रामाणिकपणे राहातो. पण आजकाल स्वार्थापायी लोकांनी आश्वासन देण्याचा सपाटा सुरू केला आहे. कोणीही उठत आहे आणि कोणताही विचार न करता, ढीगभर आश्वासन देऊन मोकळा होत आहे. काही काही जण तर जी गोष्ट कधीच शक्य नाही, त्या गोष्टीचे पण आश्वासन देतात. मग असले निरर्थक आश्वासन काय कामाचे? मान्य आहे की, काही आश्वासन देणे आपल्यासाठी खूप महत्त्वाचे व गरजेचे असते. आई-वडिलांनी दिलेले आश्वासन आपल्यासाठी खूप खूप हिताचे असते. भलेही ते आश्वासन आईवडील पाळतील अथवा न पाळतील पण त्या आश्वासनामागे आई-वडिलांचा कसलाच स्वार्थ दडलेला नसतो. त्यामागे आपले यश व आई-वडिलांच्या अपेक्षा लपलेल्या असतात. आईवडील आपल्या मुलांना म्हणतात की, तू दहावी व बारावीला एवढे टक्के घेऊन उत्तीर्ण हो, मग तुला आम्ही गाडी घेऊन देऊ, तुला चांगल्या कॉलेजमध्ये शिकायला ऍडमिशन घेऊन देऊ, तुझ्या मनावर तुला भारी किमतीचा हायफाय मोबाईल घेऊन देऊ, तुझ्या मनावर मनपसंत स्थळ बघून तुझे लग्न लावून देऊ, असे आपल्या भल्यासाठी व कल्याणासाठी आपले आई वडील आपल्याला आश्वासन देतात. त्यांना वाटते की, आपला मुलगा या आश्वासनाकडे बघून खूप खूप अभ्यास करेल व चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होईल व आपले नाव करेल, असे प्रत्येक आई-वडिलांना मनोमन वाटते. म्हणून आई-वडील आपल्या मुलांना आश्वासन देतात. भलेही ते त्या आश्वासनाची पूर्तता करतील अथवा न करतील पण या आश्वासनामागे त्यांचा कसलाच स्वार्थ नसतो. हे झाले आपल्या भल्यासाठी आईवडीलांचे निस्वार्थ आश्वासन. काही तरुण-तरुणी प्रेमात खूप आश्वासन देतात. मी तुझ्यावर खूप खूप प्रेम करतो. फक्त तू मला एकदा होकार देऊन बघ, तुझ्या जीवनात सुखाची व आनंदाची मंगलमय पहाट घेऊन येईल. तुला फुलासारखे छान व चैन विलासात ठेवेल. एवढेच नाही तर तुझ्यासाठी जीव पण द्यायला तयार होईल. इतके जीवापाड प्रेम मी तुझ्यावर करेल. पण जेव्हा त्या मुलीवर खरंच संकटाची वेळ येते किंवा दुःखाचा डोंगर कोसळतो, तेव्हा तिच्यासाठी जीव देणारा हा प्रेमवेडा बहाद्दर पाटीला पाय लावून पळून जातो. हे चित्र मी माझ्या डोळ्यांनी पाहिले आहे. आपणही पाहिले असेल, यात शंका नाही. काही काही नातेवाईक पण फार स्वार्थी, लबाड व ढोंगी असतात. आपला स्वार्थ साधेपर्यंत आपल्याशी गोड गोड बोलतात, तुझ्यासाठी मी अमुक अमुक गोष्ट करेल, तुला माझी मुलगी देईल, तुझ्यासाठी खूप छान स्थळ आणेल. तुझ्या अडीअडचणीला मी आर्थिक मदत करेल, तुझ्यावर कसलेही संकट येऊ दे, तू फक्त मला फोन कर असे ठणकावून सांगणारे नातेवाईक आपल्यावर जेव्हा खरंच संकट येते तेव्हा मात्र आपल्यापासून लांब जातात. आपला फोन देखील उचलायला तयार नसतात. त्यांचा स्वार्थ साधून घेतला की, मग मात्र दिलेल्या आश्वासनाला विसरून जातात.

पण या पृथ्वीतलावर आश्वासनाला जागणारी माणसे पण खूप आहेत. हे आपल्याला नाकारता येणार नाही. माझे आजोबा दिवंगत व्यंकटी बाबुराव कांबळे हे देखील एक वचनी होते. दिलेला शब्द तंतोतंत पाळायचे. दिलेल्या शब्दाला जागायचे. त्यांनी आयुष्यात कधीच लबाड बोलले नाहीत. आणि लबाड बोलणाऱ्याला व दिलेला शब्द न पाळणाऱ्याला कधीच सोडले नाही. हे मी जवळून पाहिले आहे. त्यांच्या पावन स्मृतींना कोटी कोटी प्रणाम करावा वाटतो.

राजकीय क्षेत्रात देखील काही प्रामाणिक व इमानदार राजकारणी होते. ते दिलेला शब्द प्रामाणिकपणे पाळून सामाजिक कार्य करायचे. जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी आपले आयुष्य खर्ची घालायचे. दिलेल्या शब्दाला जागून धडाडीने काम करायचे. शिक्षणाचे महामेरू डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे देखील एक निस्वार्थ राजकारणी होते. त्यांनी आयुष्यात दिलेल्या शब्दांचे पालन केले नाही असे कधी झाले नाही. त्यांनी जीवनभर गोरगरीब व तळागाळातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रामाणिकपणे काम केले आहे. त्यांच्या कार्याला जगात तोड नाही. त्यांनी लोकांकडून कधीच कशाची अपेक्षा केली नाही. आणि जनतेचा कधीच अपेक्षाभंग केला नाही. म्हणून या महापुरुषाला जनतेने कायम हृदयात मानाचे अढळ स्थान दिले आहे.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा केंद्रीय मंत्री लोकनेते दिवंगत विलासरावजी देशमुख साहेब हे देखील एक निस्वार्थ राजकारणी होते. विशेष म्हणजे ते एकवचनी होते. दिलेला शब्द तंतोतंत पाळून जनहिताचे निर्णय घेण्यात तरबेज होते. त्यांनी स्वार्थी राजकारण कधीच केले नाही. दिलेला शब्द कधी मोडीत काढला नाही. कायम जनतेम ध्ये राहून जनहितासाठी राजकारण केले. त्यांची राजकीय क्षेत्रात जबरदस्त पकड होती. या निस्वार्थ राजकीय महापुरुषांनी जरी ढीगभर आश्वासन दिले असतील पण टिचभर तरी मदतकार्य करण्यात ते यशस्वी झाले आहेत. हे कोणालाही मान्य करावेच लागेल. म्हणून आजकालच्या तमाम जनतेला सांगू इच्छितो की, बाबांनो तुम्ही ढीगभर आश्वासन द्या पण टिचभर तरी इतरांना मदतकार्य करा...नुसते पोकळ आश्वासन देण्यात काहीच अर्थ नाही.

जीव ओतून समाजकार्य करत रहा... दिलेल्या वचनाला जागत राहा... नक्कीच तुमचे नाव एक जबरदस्त अवलिया म्हणून सुवर्ण अक्षरांनी इतिहासात लिहिले जाईल...

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# अवकाळी वादळी वाऱ्यासह पडलेल्या पावसामुळे झालेल्या केळी पिकाच्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करा - आ. लोणीकर

### कनकवाडी, आसनगाव, सोपारा, सातोना खुर्द शिवारातील नुकसानीची आ. लोणीकर यांनी तहसीलदार कृषी अधिकारी गटविकास अधिकारी यांच्यासह केली पाहणी

**परतूर । प्रतिनिधी -** दिनांक ०५ रोजी सायंकाळच्या सुमारास परतुर तालुक्यातील अनेक गावांमध्ये वादळी वाऱ्यांसह जोरदार पाऊस झाला या पावसामुळे केळी व फळबागांचे प्रचंड नुकसान झाले या पार्श्वभूमीवर परतुर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी कनकवाडी, सोपारा, आसनगाव सातोना आदी भागात दौरा करून झालेल्या नुकसानीची पाहणी करत तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश प्रशासनाला दिले

थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन लोणीकरांनी शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची पाहणी करताना सांगितले की, अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह पावसामुळे शेतकऱ्यांनी जिवापाड पोचलेल्या केळी पिकाचे व फळबागांचे प्रचंड नुकसान झालेले असून आपण याबाबतीत शासनाकडे पाठपुरावा करत नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळवून देणार असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले

पुढे ते म्हणाले की केंद्र व राज्यातील सरकार खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून शेतकऱ्यांच्या सुखदुःखामध्ये आपण नियमितपणे त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले

पुढे बोलताना ते म्हणाले की, शेतकरी आपली पिके जीवाच्या जतन सांभाळत असतो मात्र अशा प्रकारचे अस्मानी संकट आल्यानंतर हवालदील झालेल्या शेतकऱ्याला आधार देण्यासाठी राज्य व केंद्र सरकार सर्व तो प्रयत्न करीत असते त्यामुळे आलेल्या या संकटामुळे खचून न जाता शेतकऱ्यांनी या संकटाचा हिमतीने सामना करावा अशी यावेळी बोलताना ते म्हणाले

पुढे ते म्हणाले की, आपण शेतकरी पुत्र असल्यामुळे आपल्याला शेतकऱ्यांच्या सगळ्या अडीअडचणी माहीत असून, अनेक वेळा आसमानी आता तोंडाशी



आलेला घास हिरावून घेत असते मात्र अशा परिस्थितीमध्ये आपण शेतकऱ्यांच्या खंबीरपणे पाठीशी उभे असून प्रशासनाने तात्काळ झालेल्या नुकसानीचे पंचनामे करावेत असे यावेळी आमदार लोणीकर यांनी सांगितले

या वेळी तहसीलदार डॉ प्रतिभा गोरे, कृषी अधिकारी श्री रोडगे तुकाराम सोळंके गजानन लोणीकर , निवृत्ती लाटे, शिवाजीराव लाटे, बंडू मानवतकर, भगवान आरडे, उमेश अर्जुन राठोड. अशोक गीताराम. दिगंबर भागवत वटाणे राजेश बाबुराव मीठे .अर्जुन सुंदरराव बापमारे .गणेशराव मिठे संतोष राठोड. विलास चव्हाण विष्णू बापू मिठे. आहेला जी मिठे .विठ्ठलराव मिठे .मधुकर मिठे .पवन मिठे. प्रदीप मिठे सुग्रीव बापमारे. सुनील मिठे विनायक मीठे. भागवत कुरधने विष्णू बोबडे. तुकाराम शेळके सोपान मिठे. हरिभाऊ वटाणे भुजंग मिठे. सुनील मिठे. सुधाकर मिठे, माणिक राठोड गणेश राठोड छत्रपती थोरात, यांच्यासह मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# परतूर पोलिसांची शहरात बेधडक कारवाई



**परतूर । प्रतिनिधी -** पोलीस ठाणे परतुर हद्दीतील उघड्यावर मास विक्री करणारे विक्रेते तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे फळ विक्रेते व भाजीपाला विक्रेते आणि रस्त्यावर वाहने उभे करून रहदारीस अडथळा निर्माण करणारे वाहन चालक यांच्यावर परतुर पोलिसांनी केली कारवाई.

काल रोजी जालना शहरात घडलेल्या एका पाच वर्षीय मुलीचा मोकाट कुत्र्यांनी जावा घेतल्याने मृत्यू झाला. या संबंधाने अशी घटना पुन्हा घडू नये यासाठी पोलीस ठाणे हद्दीतील ज्या ठिकाणी उघड्यावर मास विक्री करणारे विक्रेते व मासाचे रॉ मटेरियल उघड्या जागेवर टाकून त्याला कुत्रे व इतर प्राणी खाऊन सदरची घटना झाली आहे या अनुषंगाने उघड्यावर मास विक्री करणारे व मासाचे रॉ मटेरियल उघड्यावर टाकणारे मास विक्रेते यांच्यावर व वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे फळ व भाजीपाला विक्रेते तसेच रस्त्यावर वाहने उभी करून रहदारीस अडथळा निर्माण करणारे वाहन चालक या संबंधित व्यक्तीवर कारवाई करून खटले दाखल करण्यात आले आहेत.

उघड्यावर मास विक्री करणाऱ्या १० व्यक्तीवर कार्यवाही करण्यात आली.

रस्त्यावर भाजीपाला व फळे विक्री करणाऱ्या १२ व्यक्तीवर कारवाई करण्यात आली रस्त्यावर वाहने उभे करून रहदारीस अडथळा निर्माणकरणाऱ्या २ वाहन चालकावर कारवाई करण्यात आली.सदरची कारवाई

मा. अजय कुमार बंसल साहेब, पोलीस अधीक्षक जालना, मा. आयुष नोपनी साहेब , अप्पर पोलिस अधीक्षक साहेब, मा. दादाहरी केशव चौरे साहेब, डउझ्झज परतूर यांच्या मार्गदर्शनाखाली एम.टी सुरवसे, पोलिस निरीक्षक, पो स्टे. परतूर, पोलीस उपनिरीक्षक मुंडे ,सफौ. खंदारे, पोहेका/ रामदास फुपाटे , पोहेका/ अशोक गाडवे, पोका/सॅम्युएल गायकवाड, पोका/दशरथ गोफनवाढ, पोका/ वंदन पवार, पोका/ राम पारवे, पोका/सुनील इलग यांनी केली आहे.

# राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया अंतर्गत शेतकरी उत्पादक कंपनीना ८ मे पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रीय खाद्यतेल अभियान तेलबिया सन २०२५-२६ अंतर्गत सोयाबीन पीकासाठी जालना जिल्हाची निवड करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत मुल्य साखळी भागीदार (तउझ) यांचे मार्फत संपुर्ण जिल्हातील कार्यक्षेत्रात समुहामध्ये प्रमाणित बियाणे वितरण, शेतकरी प्रशिक्षण व शेतीशाळा इ. घटक राबवायचे आहेत. याकरीता खालील निकष पुर्ण करणारे शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्था यांची निवड करावयाची आहे.

मुल्य साखळी भागीदार (तउझ) म्हणुन निवड करावयाच्या शेतकरी उत्पादक कंपनीकरीता पुढील प्रमाणे पात्रता निकष असणार आहेत. यामध्ये कंपनी कायदा किंवा सहकारी कायद्यांतर्गत नोदणी केलेली असावी. ज्या जिल्हात समुह तयार झाला आहे, तेथे काम करण्याचा किमान ३ वर्षाच अनुभव असावा, म्हणजेच नोंदणी माहे मार्च, २०२२ पुर्वीचा असावा. किमान २०० शेतकरी, उत्पादक कंपनी मध्ये किंवा सहकारी संस्थेमध्ये नोदंणीकृत असावेत. सहकारी संस्था असल्यास संस्थेच्या उद्धिष्टामध्ये तेलबिया पिकांत कामकाजाबाबत नमुद असावे. मागील ३ वर्षातील सरासरी वार्षिक उलाढाल ९ लाख रूपयापेक्षा जास्त असावी. शेतकरी उत्पादक कंपनी मध्ये शेतकयांचा किमान ३ लाख रूपयांचा सहभाग असावा. शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्था प्राधान्याने कमी उत्पादकता असणाऱ्या तालुक्यामध्ये कार्यरत असावी. सरकारकडून अनुदान प्राप्त कर्त्या शेतकरी उत्पादक संघाला प्राधान्य दिले जाणार आहे. रू. १०,००० शेतकरी उत्पादक संघ योजनेअंतर्गत तयार केलेले शेतकरी उत्पादक कंपनी, NFED NSC-OS इ= सार्वजनिक संस्थाकडे नोंदणीकृत तेलबियाशी संबंधित शेतकरी उत्पादक कंपनी यांना वरील पात्रता निकषाच्या पुर्ततेच्या अधीन राहुन प्राधान्य दिले जाणार आहे. या योजनेच्या मार्गदर्शक सुचनेच्या अधीन राहून वरील निकषांचे पुर्तता करणारे इच्छूक शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्था यांनी सोयाबीन पिकासाठी दि. ०८ मे, २०२५ पर्यत वरील निकषाच्या आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह संबधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयाकडे कंपनीच्या लेटर हेडवर संचालक मंडळाच्या ठरावासह अर्ज सादर करावेत. अधिक माहितीसाठी तालुका कृषि अधिकारी कार्यालयास संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकरी श्री. कापसे यांनी केले आहे.


